म.न.पा. ठराव क्र. 8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 20 (3) नुसार गठीत गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समितीची सभा मंगळवार दि. 30.01.2018 रोजी सकाळी 11.30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली, त्या सभेतील चर्चेचा संक्षिप्त वृत्तांत.

सभेत मा.सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती श्रीमती चेतना टांक, उपसभापती श्रीमती वंदना यंगटवार, मा.सदस्य श्री. मनोज सांगोळे, मा. सदस्य श्री. नरेंद्र वालदे, मा.सदस्य श्री.सुनिल हिरणवार, मा.सदस्या श्रीमती मंगला खेकरे, मा.सदस्या श्रीमती स्नेहा निकोसे तसेच प्रशासनाकडून उपायुक्त श्रीमती रंजना लाडे, अति.उपायुक्त श्री.मोहिते, कार्यकारी अभियंता(स्लम) श्री.जांभुळकर आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरवात केली. सुरूवातीला कार्यकारी अभियंता श्री. जांभुळकर यांनी माहिती देतांना सांगितले कि, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रिय विकास प्राधीकरण (म्हाडा) ला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. नागपूर शहराकरिता एन.आय.टी, म्हाडा व महानगरपालिकेच्या माध्यमातुन ही योजना राबवायची आहे. याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले. इंटरनेटच्या माध्यमातुन 72,013 अर्ज ऑनलॉईन प्राप्त झाले आहे तर 82 हजार ऑफलाईन अर्ज आहेत. या संपुर्ण डाटा म्हाडाकडे पाठविण्यात आला आहे. अर्जाच्या छाननीनंतर 41,418 अर्ज पात्र ठरले आहे. यातून लकी ड्रॉ काढून घरे दिली जातील. एन.आय. टी.कडून मौजा वाठोडा येथे काम सुरू झाले आहे. एस.आर.ए.अंतर्गत घरकुल योजनेत 4064 घरांपैकी 4201 तयार झाले आहेत आणि 3550 घरांचे वाटप करण्यात आले आहे. गोपालनगर येथे 180 पैकी 171 घरांचे वाटप झाले असून 9 घरांचा ताबा द्यावयाचा आहे असेही त्यांनी सांगितले.

कार्यकारी अभियंता श्री.वासनिक यांनी माहिती देतांना सांगितले, आमच्याकडे आलेली लाभार्थ्यांची यादी म्हाडाकडे आणि बॅकेकडे सुध्दा पाठविण्यात आली आहे. ज्या ज्या स्कीमकरिता नागरिक इच्छुक आहेत त्याबाबत त्यांना अर्ज करावा लागेल. या योजनेत बॅकेचीच मुख्य भुमिका राहणार आहे. महानगरपालिकेला फक्त लाभार्थ्यांची यादी बॅकेला द्यावयाची आहे. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणा–या घरांच्या निर्मितीकरिता नियम, निकष दिलेले आहे त्याप्रमाणे बॅकेकडून कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. बीएसयुपी योजनेअंतर्गत मौजा नारी मध्ये 3 जागा आणि वांजरा येथे 1 जागा महानगरपालिकेने सुचविलेली आहे. 1,118 घरांचा प्रस्ताव महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रिय विकास प्राधीकरणाकडे पाठविला आहे. त्यात काही क्युरी आली ती आम्ही दुरूस्त करून पाठविली आहे. जागेचे उपलब्धनुसार घरकुल बनविण्यात येतील. आता नवीन आलेल्या जी.आर.नुसार या योजनेत खाजगी बिल्डर्स् तसेच खाजगी जागेचे मालक यात सहभागी होवू शकतील. कृषी आणि विकास न झालेल्या जागेवर सुध्दा ही स्कीम बनविता येवू शकते असेही त्यांनी सांगितले.

तद्नंतर मा.सभापती यांनी सुचित केले कि, एस.आर.ए. अंतर्गत बांधण्यात येणा–या घरांच्या संदर्भात मोठया प्रमाणात नागरिकांकडून तकारी प्राप्त होत आहे त्या ठिकाणी पुरेपुर नागरी सुविधा नसल्यामुळे त्यांना त्रास सोसावा लागत आहे याकडे विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे. वाठोडा ,एस.आर.ए. स्कीम अंतर्गत जी घरे बांधण्यात आली आहे तेथे समितीच्या सदस्यांसोबत पहाणी करण्याकरिता आज दुपारनंतर 3.00 वाजता दौरा आयोजित करण्यात यावा. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणा–या घरांच्या निर्मितीकरिता नियम, निकष दिलेले आहे त्याची सविस्तर माहिती समिती सदस्यांना देण्यात यावी.

मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे यांनी सांगितले कि, श्रीकृष्णधाम, मल्का कॉलनी आणि नशेमन हाऊसिंग सोसायटी येथे राहणा–या लोकांची घरे अनधिकृत ठरवून पाडण्यात आल्यामुळे तेथील लोक बेघर झालेले आहे. या लोकांना या योजनेचा फायदा करून देवू शकतो काय? या बेघर झालेल्या लोकांसाठी कोणती योजना अंमलात आणु शकतो काय? या अनुषंगाने

शासनाशी पत्रव्यवहार करण्यात यावा तसेच पंतप्रधान आवाज योजनेअंतर्गत म्हाडा, एन.आय.टी. आणि बॅकेच्या अधिका–यांची बैठक लावण्यात यावी असे सुचित केले.

मा.सदस्य श्री.सुनिल हिरणवार यांनी पंतप्रधान आवास योजनेचा प्रचार प्रसार मोठया प्रमाणात करण्यात यावा असे सुचविले. सभेत होणा–या चर्चेवर आणि मा.सदस्यांनी मागितलेल्या माहिती संबंधित विभागाने लक्ष देवून माहिती पुरवावी असे सुचविले.

उपायुक्त श्रीमती रंजना लाडे यांनी सभेत माहिती देतांना सांगितले कि, नागपूर महानगरपालिकेच्या विद्यमाने होणारा उद्योजिका मेळावा रेशिमबाग येथे दिनांक 4 फेब्रुवारी ते 11 फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. दि. 4 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 7.00 वाजता उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.

शेवटी मा.सभापती श्रीमती चेतना टांक यांनी निर्देशित केले, आवास योजनेबाबत प्रत्येक प्रभागातील लोक प्रश्न विचारू लागले आहेत. या योजनेचे प्रारूप व पात्र नागरिकांची यादी जाहीर न केल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे योजनेच्या कामाला गती द्यावी व त्याची माहिती वेळोवेळी नगरसेवकांना देण्यात यावी. जेणेकरून मा. सदस्यांना नागरिकांना माहिती देता येईल. ज्या ठिकाणी आवास योजनेचे काम सुरू आहे त्याची पाहणी समिती सदस्यांकडून करण्यात येईल जेणेकरून नागरिकांना याबाबत माहिती देता येईल. एसआरए अंतर्गत तयार झालेल्या घरकुलाचा ताबा नागरिकांना ताबडतोब देण्यात यावा. केटीनगरचे एसआरएचे कार्यालय महानगरपालिकेच्या सिव्हील कार्यालयात स्थानांतरीत करण्यात यावे जेणेकरून नागरिकांना समन्वय साधण्यास सोयीचे होईल असे मा.सभापती यांनी निर्देशित करून सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती